**दिनांक : २३/१२/२२**
**विषय : सोसाइटी च्या पुनर निर्माण प्रक्रियेत शॉर्ट लिस्ट केलेल्या १० विकसकांशी झालेली चर्चा.**

सोसायटीतील सभासदाच्या 26/11/22 झालेल्या मेळाव्यात ठरल्या प्रमाणे 12 ते 15 डिसेंबर मधे आपण शॉर्ट लिस्ट केलेल्या 10 विकासकांशी, आपले पुनर निर्माण प्रकल्पा चे सल्लागार श्री हर्षल कवडिकर, विधी सल्लागार श्रीमती किरण काबरा, सर्व पंच समिती सदस्य आणि विशेष आमंत्रित सभासद / सह सभासद श्री शशांक गोखले, श्री अरविंद करंदीकर, श्री गणेश शिरोडे, श्री अनिरुद्ध अनगळ, अड. किशोर जकाते, श्री श्रीवर्धन गाडगीळ यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यात आली.

प्रत्येक विकासकाला त्यांच्या प्रेझेन्टेशन साठी एका तासाचा वेळ देण्यात आला होता. त्यात त्यांनी त्यांच्या कंपनी ची माहिती (एकाच मालकाची कंपनी, पार्टनरशिप कंपनी, लिमिटेड कंपनी, कंसोर्शियम इत्यादि), त्यांनी केलेले बिल्डिंग प्रकल्प, चालू असलेली तसेच पुनर निर्माण क्षेत्रात केलेली कामं, पत्रकार नगर च्या पुनर निर्माणा बद्दल त्यांचे असलेले विजन जसे सध्याच्या प्रत्येक सभासदाला देण्यात येणारी वाढीव जागा, सुख सोई, मोकळी जागा, निर्माण होणाऱ्या व्यावसायिक भागा बाबत माहिती, अधिकच्या नवीन निर्माण होणाऱ्या फ्लॅट्स ची संख्या तसेच त्यांचे आकार, प्रोजेक्ट मिळाल्यानंतर प्रकल्प पूर्ण करून फ्लॅट्स चा ताबा देण्यापर्यंत चा कालावधी सारख्या विविध बाबींवर प्रकाश टाकला. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची ही उत्तरं दिली.

चर्चे च्या सुरवाती ला त्या विकासकाने आपल्या एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट च्या उत्तरा दाखल प्राथमिक बिडींग मधे काय डिटेल्स दिले आहेत हे श्री कवडीकरांनी वाचून दाखवले.

15/12/22 ला शेवटच्या विकसकाचे प्रेझेन्टेशन झाल्यानंतर आपले सल्लागार, पंच समिती सदस्य आणि विशेष आमंत्रितांना विनंती करण्यात आली की प्रत्येकाने झालेल्या presentations वर आपले स्वतंत्र मनोगत आणि 10 विकासकाना दिलेला क्रम, लेखी स्वरूपात, 17/12/22 पावेतो संस्थे च्या सचिवांकडे द्यावा म्हणजे त्यावर19/12/22 ला सल्लागारांन सोबत होणाऱ्या पंच समिती च्या मीटिंग मधे परत शॉर्ट लिस्टिंग करून 10 पेकी 7 विकसकांची निवड करता येईल.

19 पेकि ज्या 10 विकासकांना ह्या चर्चे साठी शॉर्ट लिस्ट केलं होतं त्यांची यादी सोबत जोडली आहे.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती च्या वती ने**